**<u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.१२/२०१९ निशाणी ४३ वरील आदेश</u>**
**<u>( प्रकाश पाटील वगैरे विरुध्द जिल्हाधिकारी, सांगली वगैरे )</u>**
**<u>CNR NO.MHSN050026572019</u>**

१. अर्जदार यांनी त्यांच्या विरुध्द झालेला 'पुरावा बंद' चा आदेश रद्दबातल होवून पुरावा देण्यास परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या मालकीची जमीन नॅशनल हायवे नं.४ चे विस्तारीकरणामध्ये संपादीत झाली असून संपादीत जमीनीचे वाढीव मुल्याकरीता पुर्ननिर्धनासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांना उपविभागीय अधिकारी, वाळवा इस्लामपूर यांच्याकडील प्रकरणातील सही शिक्क्याच्या प्रति मिळण्यास विलंब झाल्याने अर्जदार पुरावा देवू शकले नाहीत. तसेच सदर कालावधीमध्ये कोवीड–१९ चा प्रादुभाव झाल्याने याकामी पुर्तता करु शकले नाहीत. त्यामुळे दिनांक ०३.०९.२०२२ रोजी अर्जदार यांचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे. अर्जदार हे अशिक्षीत व कायदयाचे ज्ञान नसलेले इसम आहेत. अर्जदार यांना पुराव्याची संधी उपलब्ध न झाल्यास त्यांच्या हक्क व अधिकार यांच्यावर गधा येणार आहे. प्रस्तुत प्रकरण गुणदोषावर निकाली होण्याकरीता अर्जदार यांचा पुरावा याकामी दाखल असणे आवश्यक आहे. अर्जदार यांनी दिनांक ०३.०९.२०२२ रोजी झालेला पुरावा बंद आदेश रद्द करणेकरीता अर्ज केला होता, परंतु त्या अर्जासोबत सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नसल्यामुळे तो नामंजूर करण्यात आलेला आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या विरुध्द झालेला पुरावा बंद आदेश रद्द करुन त्यांना पुरावा देण्याची परवानगी दयावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. जाबदार क्र.४ यांनी नि.क्र.४४ वर प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास ठाम विरोध दर्शविला. जाबदार यांच्या म्हणण्याप्रमाणे अर्जदार यांनी याकामी पुरावा दाखल केला नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द पुरावा बंद असा आदेश झालेला आहे.

अर्जदार यांनी जाणूनबुजून प्रस्तुत कामी पुरावा दिलेला नाही. करीता अर्जदार यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, यदाकदाचित न्यायालय अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्रत आल्यास अर्जदार यांना जास्तीत जास्त कॉस्ट करण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. सदर अर्जास अनुसरुन प्रकरणाचे अवलोकन केले. अर्जदार यांनी मुळ अर्ज राष्ट्रीय महामार्गासाठी संपादीत केलेल्या क्षेत्राची वाढीव रक्कम मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार यांना वेळोवेळी पुराव्याची संधी देवूनही त्यांनी पुरावा दिला नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द पुरावा बंद असा आदेश पारीत केलेला आहे. सदर प्रकरण जाबदारच्या पुराव्याकरीता नेमण्यात आले आहे. अर्जदारच्या म्हणण्यानुसार ते अशिक्षीत व कायदयाचे ज्ञान नसलेले शेतकरी असल्यामुळे व वाढीव रक्कमेबाबत त्यांना ज्ञान नसल्याने, तसेच कोविड–१९ च्या प्रादुर्भावामुळे प्रस्तुत अर्जाच्या कामी हजर राहून पुरावा नोंदविणे शक्य झाले नसल्यामुळे त्यांचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात दिनांक १८.११.२०२१ रोजी मुद्दे निश्चित केले. खरे तर जानेवारी २०२२ पासून न्यायालयाचे कामकाज पूर्ण गतीने सुरुही झाले होते. वादीने जानेवारी २०२२ ते दिनांक १६.१०.२०२४ या कालावधीत पुरावा का दिला नाही याचे संयुक्तीक कारण दिलेले नाही. असे असले तरी त्यांना पुरावा दाखल करण्याची संधी देणे न्यायोचित होईल. अर्जदार यांना पुरावा दाखल करण्याची परवानगी न दिल्यास त्यांना त्यांचा पुरावा देण्यापासून व त्यांची बाजु मांडण्यापासून प्रतिरोधीत केल्यासारखे होईल, तसेच त्यामुळे कार्यवाहीचे बाहुल्य होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता प्रस्तुत प्रकरणाचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता अर्जदार यांना पुराव्याची संधी देणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. झालेला विलंब लक्षात घेता अर्जदार यांच्यावर खर्च लावून त्यांना पुरावा दाखल करण्याची संधी दिल्यास त्यांचे कोणतेही नुकसान संभवत नाही. वरील सर्व बाबीचा सारासार विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्जदार यांचा नि.क्र.४३ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांचेविरुध्द दिनांक ०३.०९.२०२२ रोजी झालेला 'पुरावा बंद' आदेश रक्कम रुपये १००/– खर्च देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

३. अर्जदार यांनी पुढील तारखेपर्यंत तालुका विधी सेवा समिती, इस्लामपूर यांच्याकडे खर्चाची रक्कम जमा करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by MUKUL MADHUSUDAN CHITALE
Date: 2024.11.26 15:50:46 +0530

**इस्लामपूर.** **(मुकुल म. चितळे)**

**दिनांक– २५.११.२०२४** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, इस्लामपूर.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, इस्लामपूर. |
| आदेश घोषीत दिनांक | - | **२५.११.२०२४** |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक- | | **२६.११.२०२४** |